सामुहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या विजाभज, इमाव व विमाप्र दांपत्यासाठी असलेल्या कन्यादान योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्र. सावियो-२०१८/प्र.क्र.११०/अर्थसं
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दि. ०२ फेब्रुवारी, २०१९

**संदर्भ** :- १) शासन निर्णय, सा.न्या,सां.क्री व वि.स.वि.क्र.साविसो-२००३/ प्र.क्र.७/सुधार-१, दि.२४.११.२००३.
२) शासन निर्णय, सा.न्या,सां.क्री व वि.स.वि.क्र.साविसो-२००५/प्र.क्र.४१/सुधार-१, दि.१८.१२.२००८.
३) शासन शुध्दिपत्रक क्र.सावियो-२००५/प्र.क्र.४१/सुधार-१, दि.२७.२.२००९
४) शासन निर्णय, सा.न्या,सां.क्री व वि.स.वि.क्र.साविसो-२०१५/प्र.क्र.१०५/सामासु-१, दि.१५.१०.२०१६.

प्रस्तावना :-

विवाह सोहळयामध्ये अनाठायी खर्च करणे व त्यासाठी प्रसंगी कर्जबाजारी होणे व त्यामुळे आर्थिक समस्येच्या खाईत लोटले जाणे, हे प्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जाती (नवबौध्दांसह) विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्गातील आर्थिक कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटूंबातील सामुहिक विवाह सोहळयामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यांना शासन निर्णय दि.२४.१२.२००३ अन्वये **कन्यादान योजना** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागामार्फत सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती (नवबौध्दांसह) विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्गातील आर्थिक कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटूंबातील सामुहिक विवाह सोहळयामध्ये सहभागी होणाऱ्या जोडप्यास एकूण रु.१०,०००/- (मणीमंगळसूत्र रु.६०००/- व संसारोपयोगी साहित्य यासाठी रु.४०००/-) इतके आर्थिक सहाय्य देण्यात येत होते.

परंतु, दि.२४.१२.२००३ चा शासन निर्णय, दि.१८ डिसेंबर,२००८ अन्वये अधिक्रमित करुन या योजनेतंर्गत सामुहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यांना पूर्वी वस्तुरुपाने देण्यात येणारे अनुदान रु.१०,०००/-इतकी रक्कम वधुचे वडील, आई आणि पालकांच्या नावे अधोरेखित धनादेशाव्दारे लग्नाच्या दिवशी देण्यात यावी अशी सुधारणा करण्यात आली. तसेच, सदर अनुदानाची रक्कम ही सन २००३ मध्ये ठरविण्यात आलेली होती. त्यामुळे, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने त्यांच्या दिनांक १५.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सदरहू सोहळयासाठी मदत करण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करुन रु.१०,०००/-ऐवजी रु.२०,०००/- तसेच स्वयंसेवी संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे विवाहासाठी देण्यात येणारे रु.२,०००/- ऐवजी रु.४,०००/- इतके अनुदान देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची नव्याने निर्मिती झाली असून, सदरहू योजना या विभागामार्फत राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

सामुहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील दांपत्यांसाठी **कन्यादान योजना** लागू करण्यात येत असून त्याकरिता मुख्य निकष खालीलप्रमाणे असतील :-

१) सामुहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यांना वस्तुरुपात देण्यात येणाऱ्या अनुदान रु.२०,०००/- इतकी रक्कम वधुचे वडील, आई किंवा पालकांच्या अधोरेखित धनादेशाद्वारे (क्रॉस चेकने) लग्नाच्या दिवशी देण्यात यावी.

२) सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या पात्र स्वयंसेवी संस्थांना प्रती जोडप्यामागे रु.४०००/- प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात यावे. यासाठी तीन महिन्यांच्या आत विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विवाह नोंदणी झाल्यानंतर रक्कम अधोरेखीत धनादेशाद्वारे देण्यात येईल.

३) या सामुहिक विवाह सोहळ्याकरिता किमान १० जोडपी असणे आवश्यक राहील.

४) या योजनेचा लाभ फक्त प्रथम विवाहासाठी आहे. तथापि, विधवा महिलेस दुसऱ्या लग्नाकरिता सुध्दा अनुज्ञेय राहील.

५) स्वयंसेवी संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असली पाहिजे, तसेच, अर्ज सादर करताना सदरहू नोंदणी प्रभावी असली पाहिजे. त्याचप्रमाणे स्वयंसेवी संस्था यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविलेला किंवा न्यायालयीन प्रकरण नसले पाहिजे.

**कन्यादान योजनेसाठी खालीलप्रमाणे अटी विहित करण्यात येत आहेत:-**

अ) सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेणाऱ्या दाम्पत्यास देण्यात येणारे अनुदान त्यांच्या प्रथम विवाहासाठीच आहे. याची खातरजमा करण्यासाठी त्या गावातील सरपंच/ पोलिस पाटील/ ग्रामसेवक व शहरासाठी नगरसेवक/ मुख्याधिकारी किंवा नागरी स्थानिक संस्थेने प्राधिकृत केलेले अधिकारी यापैकी दोघांचे प्रमाणपत्र आयोजकांनी प्रस्तावासोबत सादर करावेत.

ब) सदर विवाह सोहळ्यामध्ये भाग घेणाऱ्या दाम्पत्यास जात प्रमाणपत्राची पडताळणी तहसिलदार किंवा उपजिल्हाधिकारी या दर्जाच्या अधिकाऱ्याकडून करणे आवश्यक राहील.

क) सदर विवाह सोहळ्यातील विवाहांची नोंदणी करण्यासाठी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागातील गट-अ, गट-ब किंवा गट-क चे अधिकारी/ कर्मचारी यापैकी एकाने विवाह सोहळ्यास प्रत्यक्ष हजर रहावे.

ड) सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या सेवाभावी संस्थेने त्यांच्या सोयीनुसार सामुहिक विवाहाचे आयोजन करावे.

इ) सदर विवाह सोहळा स्वयंसेवी संस्थांबरोबर केंद्र/ राज्य शासकीय स्वायत्त संस्था/ शासकीय प्राधिकरणे/ सार्वजनिक प्राधिकरणे/ जिल्हा परिषद इत्यादीं यांना देखील आयोजित करता येईल.

२. सदर योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येईल. या योजनेचा लाभ विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जोडप्यांना देण्यात येईल. या योजनेअंतर्गत द्यावयाचे अनुदान वितरीत करण्याची जबाबदारी संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे. याकरिता संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात येत असून, त्याची रचना खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे | अध्यक्ष |
| २ | सह संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे | सदस्य |
| ३ | प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण (संबंधित विभागाचे) | सदस्य |
| ४ | संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य |
| ५ | उप संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे | सदस्य सचिव |

सदर समितीने स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन, नियमानुसार पात्र ठरवलेल्या जोडप्यांची संस्थेनिहाय यादी तयार करावी व त्यास मान्यता द्यावी.

३. सेवाभावी संस्था/ यंत्रणेने सामुहिक विवाह सोहळयामध्ये सहभागी झालेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जोडप्यांची "परिशिष्ट-अ" प्रमाणे माहिती/ संबंधितांची छायाचित्रे विहीत नमुन्यातील अर्ज इ. कागदपत्रे विवाह संपन्न होण्याच्या किमान ३० दिवस अगोदर विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे सादर करावीत.

४. प्रस्तुत योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्यास पात्र होण्याबाबतचे निकष परिशिष्ट-अ प्रमाणे राहतील या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यासाठी संबंधितांना परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या नमुन्यात आपले अर्ज सादर करावेत.

५. विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जोडप्यांसाठी येणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा:-

"मागणी क्र. झेडजी -०३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, १०२, आर्थिक विकास, (०१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण, (०१) (०४) कन्यादान योजनेअंतर्गत नवविवाहीत दांपत्यांना वित्तीय सहाय्य (२२२५ ई ८३९)"

६. सदरहू शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५६८/व्यय-१४, दि.२४.१२.२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०२०२१६०६३२९९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao
Raghunath
Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept, postalCode=400032, st=Maharashtra,
[illegible]
cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.02.02 16:08:15 +05'30'

(भा.र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) आयुक्त, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

१२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६) सर्व जिल्हाधिकारी.
१७) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०) सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
२१) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
२२) सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२४) उप सचिव, नियोजन विभाग (का.अर्थ-५/व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
२५) सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ सर्व कक्ष अधिकारी, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) निवडनस्ती (कार्या.अर्थसंकल्प).

शासन निर्णय, क्रमांक: सावियो-२०१८/प्र.क्र.११०/अर्थसंकल्प, दि. ०२.०२.२०१९ चे

परिशिष्ट "अ"

## सामुहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी पात्रतेचे निकष

--------

१) वधू व वर हे महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (Domicile) असले पाहिलेत.

२) नवदांपत्यातील वधू/वर यापैकी दोन्ही किंवा एकजण हे विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास व इतर मागास प्रवर्गातील असावेत.

३) दांपत्यापैकी वराचे वय २१ व वधूचे वय १८ वर्षापेक्षा कमी असू नये.

४) वधू व वर यांच्या प्रथम विवाहासाठीच हे अनुदान अनुज्ञेय असेल. तसेच सदरील योजनेचा लाभ विधवा महिलेस दुसऱ्या लग्नाकरिता देखील अनुज्ञेय राहील.

५) बालविवाह प्रतिबंधक कायदा व हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दांपत्य/कुंटूंब यांच्याकडून झालेला नसावा. याबाबत **परिशिष्ट- "ड"** नुसार लेखी प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

६) जातीचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले असावे.

७) सदर विवाह सोहळयामध्ये भाग घेणाऱ्या दांपत्यांस जात प्रमाणपत्राची खातरजमा तहसिलदार किंवा उपजिल्हाधिकारी या दर्जाच्या अधिकाऱ्याकडून करणे आवश्यक राहील.

८) आंतरजातीय विवाह असल्यास त्यासाठी शासन निर्णय क्र.युटीए-१०९९/प्र.क्र.४५/ मावक-२, दि.२०.०१.१९९९ नुसार जे फायदे मिळतात तेही फायदे अनुज्ञेय राहतील.

९) सामूहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या दांपत्याच्या पालकांनी "परिशिष्ट-क" मधील माहिती द्यावी.

## सामुहिक सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्था/यंत्रणेचे निकष

१) स्वयंसेवी संस्था/यंत्रणा, स्थानिक नोंदणी अधिनियम, १९६० व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १८५० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

२) सामुहिक विवाहासाठी कार्य करणारी स्वयंसेवी संस्थ/यंत्रणा सेवाभवी असावी. तसेच केंद्र राज्य शासकीय स्वायत्त संस्था/ शासकीय प्राधिकरणे/ सार्वजनिक प्राधिकरणे/ जिल्हा परिषद असावीत.

३) सेवाभावी संस्था/केंद्र/ राज्य शासकीय स्वायत्त संस्था/ शासकीय प्राधिकरणे/ सार्वजनिक प्राधिकरणे/ जिल्हा परिषद यांनी आयोजित केलेल्या सामुहिक विवाह सोहळयामध्ये केला जाणाऱ्या खर्चासाठी प्रति पात्र जोडपे रु.४०००/- शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

४) सामुहिक विवाह सोहळयासाठी किमान १० दांपत्ये (२० वधू व वर) असणे आवश्यक राहील.

५) सामुहिक विवाह सोहळयातील विवाहांची नोंदणी करण्यासाठी विवाह नोंदणी अधिकारी, सामाजिक न्याय विभागाने गट-अ व गट-ब चे अधिकारी तसेच विस्तार अधिकारी/ गटविकास अधिकारी/ नायब तहसिलदार/ तहसिलदार यांनी प्रत्यक्ष हजर रहावे.

६) सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यासाठी क्षेत्रबंधन लागू होणार नाही.

********

## विवाह विषयक माहिती

| | | |
|---|---|---|
| १) | सामुहिक विवाह आयोजित करणाऱ्या संस्थेचे/ यंत्रणेचे नाव | :- |
| २) | सामुहिक विवाहाचे ठिकाण | :- |
| ३) | सामुहिक विवाह आयोजित केल्याची तारीख | :- |
| ४) | विवाह पध्दती | :- वैदिक/ नोंदणी |
| ५) | प्रथम विवाह आहे काय ? | |
| | (अ) वर | :-होय/ नाही |
| | (ब) वधू | :- होय/ नाही |
| ६) | लग्नापूर्वी विधूर/विधवा होत/होती काय ? | |
| | (अ) वर | :-होय/ नाही |
| | (ब) वधू | :- होय/ नाही |
| ७) | यापूर्वी सदर योजनेखाली अर्थसहाय्याची मागणी केली आहे काय ? | :- होय/ नाही |
| ८) | अन्य जिल्हामध्ये अशा प्रकारचा अर्ज केला आहे काय ? | :- होय/ नाही |

आम्ही खाली स्वाक्षरी करणारे वर/ वधू सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, उपरोक्त नमूद करण्यात आलेली संपूर्ण माहिती आमचे ज्ञानानुसार खरी व वस्तुस्थितीवर आधारित असून सदर माहिती खोटी असल्यास/ वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे निदर्शनास आल्यास होणाऱ्या कार्यवाहीस आम्ही संपूर्णता जबाबदार आहोत.

ठिकाण: वराचे नाव व स्वाक्षरी वधूचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :

शासन निर्णय, क्रमांक: सावियो-२०१८/प्र.क्र.११०/अर्थ, दि. ०२.०२.२०१९ चे

## परिशिष्ट "क"

प्रति,

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,

-----------------------------------

हमीपत्र लिहून देणार :

१) वराचे नाव :-

(अ) वय :-

(ब) व्यवसाय :-

(क) पूर्ण पत्ता :-

२) वधूचे नाव :-

(अ) वय :-

(ब) व्यवसाय :-

(क) पूर्ण पत्ता :-

माझ्या पाल्याचे ---------------------------------------- या संस्थेने दिनांक --- -------------- रोजी --------------------------------- या ठिकाणी आयोजित केलेल्या सामूहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करण्याचे निश्चित केले आहे. आम्ही यासाठी शासनामार्फत देण्यात येणाऱ्या कोणत्याही प्रोत्साहन अनुदानासाठी यापूर्वी अर्ज केलेला नाही. तरी आम्हांला विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत देण्यात येणारे प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे, ही विनंती.

वर /वधुच्या वडीलाचे/आईचे/पालकाचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :

ठिकाण :

**********

## परिशिष्ट-ड

**बाल विवाह प्रतिबंध कायदा व हुंडा विरोधी कायद्याचा भंग न केल्याबाबत वर / वधू यांनी लिहून द्यावयाच्या प्रतित्रापत्राचा नमुना (सदर प्रतिज्ञापत्र रु.२०/- (अक्षरी रुपये वीस फक्त) चे स्टँप पेपरवर असावे.)**

समंस

नोटरी /सक्षम अधिकारी

**प्रतिज्ञापत्र लिहून देणार :**

१) वराचे नाव :-

(अ) वय :-

(ब) व्यवसाय :-

(क) पूर्ण पत्ता :-

२) वधूचे नाव :-

(अ) वय :-

(ब) व्यवसाय :-

(क) पूर्ण पत्ता :-

आम्ही उभयंताने-------------------------------------------------- या संस्थेने दिनांक -------------- रोजी ---------------------- या ठिकाणी आयोजित केलेल्या सामुहिक विवाह सोहळयामध्ये सहभागी होऊन विवाह करण्याचे निश्चित केलेले आहे. आम्ही उभयंता मागासवर्गीयांपैकी--------------- समाजाचे असून आम्ही स्वखुशीने सदर विवाह सोहळयात सहभागी होत आहोत. आमचा विवाह आपसात संमतीने निश्चित झाला असून, आम्हांवर कोणाचे दडपण नाही. प्रसतुत विवाह निश्चित करतांना आमच्याकडून अथवा आमच्या कुटूंबियांकडून बाल विवाह प्रतिबंध कायदा/ हुंडा विरोधी कायद्यातील तरतुदींचा भंग होणारे कोणतेही कृत्य घडलेले नाही अथवा भविष्यात घडणार नाही. सबब, सामुहिक विवाहात सहभागी होणाऱ्या मागासवर्गीय दांम्पत्यांना अर्थसहाय्य योजनेर्तत देय असलेले अर्थसहाय्य आम्हांस मिळणेबाबत विनंती आहे.

वर नमूद तपशिल आमचे ज्ञानानुसार व माहितीनुसार खरा व वस्तुस्थितीवर आधारित आहे. यात कोणत्याही प्रकारचा दोष अथवा दिशाभूल करणारी व वस्तुस्थितीशी विसंगत अशी माहिती निदर्शनास आल्यास कायद्यातील तरतुदीनुसार आम्ही दंडात्मक कारवाईस वा अन्य शिक्षेस पात्र राहू म्हणून प्रतिज्ञापत्र लिहून दिले.

वराचे नाव स्वाक्षरी

वधुचे नाव स्वाक्षरी

समोर

(स्वाक्षरी)

नोटरी/सक्षम अधिकारी

दिनांक:

ठिकाण :

सामुहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या विजाभज, इमाव व विमाप्र दांपत्यासाठी असलेल्या कन्यादान योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन शुध्दिपत्रक क्र.सावियो-२०१८/प्र.क्र.११०/अर्थसं
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दि.०४/०५/२०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.न्या,सां.क्री व वि.स.वि.क्र.साविसो-२००३/ प्र.क्र.७/सुधार-१, दि.२४.११.२००३.
२) शासन निर्णय, सा.न्या,सां.क्री व वि.स.वि.क्र.साविसो- २००५/प्र.क्र.४१/सुधार-१, दि.१८.१२.२००८.
३) शासन शुध्दिपत्रक क्र.सावियो-२००५/प्र.क्र.४१/सुधार-१, दि.२७.२.२००९
४) शासन निर्णय, सा.न्या,सां.क्री व वि.स.वि.क्र.साविसो- २०१५/प्र.क्र.१०५/सामासु-१, दि.१५.१०.२०१६.
५) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०२/०२/२०१९

**शुध्दिपत्रक** :- सामुहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या विजाभज, इमाव व विमाप्र दाम्पत्यासाठी सदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये कन्यादान योजना लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये याखाली स्तंभ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या मुद्दा ऐवजी स्तंभ क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वाचावे.

| अ.क्र. | शासन निर्णय दि.२.२.२०१९ अन्वये | योजनेमध्ये सुधारणा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | **शासन निर्णयातील परिच्छेद ३** :- "सेवाभावी संस्था/यंत्रणेने सामुहिक विवाह सोहळयामध्ये सहभागी झालेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जोडप्यांची "परिशिष्ट-अ" प्रमाणे माहिती/संबंधितांची छायाचित्रे विहीत नमुन्यातील अर्ज इ. कागदपत्रे विवाह संपन्न होण्याच्या किमान ३० दिवस अगोदर **विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी** यांच्याकडे सादर करावीत". | **शासन निर्णयातील परिच्छेद ३** :- "सेवाभावी संस्था/यंत्रणेने सामुहिक विवाह सोहळयामध्ये सहभागी झालेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जोडप्यांची "परिशिष्ट-अ" प्रमाणे माहिती/संबंधितांची छायाचित्रे विहीत नमुन्यातील अर्ज इ. कागदपत्रे विवाह संपन्न होण्याच्या किमान ३० दिवस अगोदर **सहायक आयुक्त समाज कल्याण अधिकारी** यांच्याकडे सादर करावीत". |
| २ | **परिशिष्ट अ, सामुहिक सोहळ्यांमध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी पात्रतेचा निकष क्रमांक ८** :- आंतरजातीय विवाह असल्यास त्यासाठी शासन निर्णय क्र.युटीए-२०१९/प्र.क्र.४५/मावक-२, दि.२०.०१.१९९९ नुसार जे फायदे मिळतात तेही फायदे अनुज्ञेय राहतील. | **परिशिष्ट अ, सामुहिक सोहळ्यांमध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी पात्रतेचा निकष क्रमांक ८** :- आंतरजातीय विवाह असल्यास त्यासाठी **सामाजिक न्याय विभागाच्या** शासन निर्णय क्र.युटीए-२०१९/प्र.क्र.४५/मावक-२, दि.२०.०१.१९९९ नुसार जे फायदे मिळतात तेही फायदे अनुज्ञेय राहतील. |
| ३ | **परिशिष्ट अ, सामुहिक सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्था/ यंत्रणेचे निकष क्रमांक १** :- स्वयंसेवी संस्था/यंत्रणा, **स्थानिक नोंदणी अधिनियम**, १९६० व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १८५० अंतर्गत नोंदणीकृत असावी. | **परिशिष्ट अ, सामुहिक सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्था/ यंत्रणेचे निकष क्रमांक १** :- स्वयंसेवी संस्था/यंत्रणा, **संस्था नोंदणी अधिनियम**, १९६० व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १८५० अंतर्गत नोंदणीकृत असावी. |

| | | |
|---|---|---|
| ४ | परिशिष्ट **"क"** :- वर/वधूच्या पालकांनी द्यावयाचे हमीपत्र **"विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी"** ऐवजी | परिशिष्ट **"क"** :- वर/वधूच्या पालकांनी द्यावयाचे हमीपत्र **"सहाय्यक आयुक्त समाज कल्याण"** यांना उद्देशून सादर करावे. |

२. सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०४१५२०५४५८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

(भा.र. गावित)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत -

१. मा.राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. आयुक्त, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६. सर्व जिल्हाधिकारी.
१७. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
२१. सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
२२. सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२४. उप सचिव, नियोजन विभाग (का.अर्थ-५/व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
२५. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/सर्व कक्ष अधिकारी, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६. निवडनस्ती (कार्या.अर्थसंकल्प).